REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 6 | MARCH - 2023

# सोलापूर जिल्ह्यातील पर्यटनाच्या नव्या वाटा

**प्रमोद रमेश हंचाटे**
(M.A. , D. Ed. , B. Ed. , SET )
मुख्याध्यापक-हिंगुलांबिका प्राथमिक शाळा, साखर पेठ, सोलापूर.
**डॉ. तुकाराम नारायण शिंदे**
(M.A.,SET,Ph.D.)
इतिहास विभागप्रमुख, ए.आर. बुर्ला महाविद्यालय सोलापूर.

## प्रस्तावना



आधुनिक पर्यटन हा शब्द तेराव्या शतकात प्रचलित झाला. याचा अर्थ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करणे, देशाटन करणे, भटकंती करणे, आपल्या आवडीच्या ठिकाणाला भेट देणे, आनंद व समाधानापोटी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणाकडे दीर्घ प्रवास करणे होय. इ.स. १९७६ मध्ये ब्रिटन मधील पर्यटन संस्थेने पर्यटनाची व्याख्या करताना असे म्हटले आहे की,

"पर्यटन म्हणजे लोकांनी त्यांच्या राहत्या घरापासून काही अंतरावरील स्थानी केलेले स्थलांतर होय. हे स्थलांतर संशोधन, व्यवसाय, मनोरंजन, व ऐषाराम अशासांठी केलेले असते."

## सोलापूरची ऐतिहासिक पार्श्वभूमी

सोलापूर शहर व जिल्हा हे महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र प्रदेशच्या सीमेवर वसलेले असून येथे मराठी,कानडी, तेलगू व मुस्लिम संस्कृतीचा संगम पहावयास मिळतो. मुंबई -मद्रास रेल्वे मार्गावरील महत्त्वाचे व्यापारी केंद्र असलेले सोलापूर हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. मध्ययुगीन काळात सोलापूर जिल्ह्याच्या सीमारेषा वेगवेगळ्या राज्यांशी जोडल्या गेल्या होत्या. १९५६ मध्ये महाराष्ट्र राज्याची पुनर्रचना केल्यानंतर हा जिल्हा द्विभाषिक मुंबई राज्यात समाविष्ट करण्यात आला. आणि १९६० पासून हा महाराष्ट्राचा जिल्हा बनला[१]. विविध जाती धर्माचे लोक येथे राहत असल्याने त्यांची बोलीभाषा ही वेगवेगळी आहे. येथे मराठी, कन्नड, तेलगू अशा विविध भाषा बोलल्या जातात. बहुभाषिक बहुजातीय सोलापूर शहराला धार्मिक व अध्यात्मिक पर्यटनाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे स्थान आहे. सोलापूर शहराच्या ग्रामनामाबद्दल आपणास विविध साधनातून माहिती मिळते. बाराव्या शतकातील सोन्नलीगे म्हणजेच सोलापूर होय[२]. यादवांच्या शासनकाळात वीरशैव संप्रदायाचे हे एक मोठे केंद्र होते. आणि सोन्नलीगे परिसरात वीरशैव पंथाचे थोर संत श्री सिद्धरामेश्वर यांचे हे ठिकाण होय.

## सोलापूर शहरातील पर्यटनस्थळे

सोलापूर शहराचा समावेश स्मार्ट सिटीत करण्यात आल्याने शहरात पर्यटनाच्या दृष्टिकोनातून नव्या वाटा निर्माण करता येऊ शकतात. सिद्धेश्वर तलाव, कंबर तलाव, हिप्परगा तलाव, भुईकोट किल्ला, सिद्धरामेश्वरांचे मंदिर, इंद्रभुवन इमारत, आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनातून पर्यटकांच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांचे स्मारक, चार हुतात्मा स्मारक अशी अनेक ठिकाणे शहरातील पर्यटनास चालना देणारी ठरू शकतात. यापैकी सिद्धेश्वर तलाव पर्यटनाच्या दृष्टिकोनातून किती महत्त्वाचे आहे याविषयी या शोधनिबंधात थोडक्यात माहिती देत आहे.

## सिद्धेश्वर तलाव

सिद्धरामेश्वरांनी तलाव बांधून शिवलिंगाची स्थापना केल्याची माहिती महाराष्ट्र राज्य गॅझेटीयर मधील इतिहास प्राचीन कालखंड-१ मध्ये पहावयास मिळते.[३] हाच सोलापूर शहरातील सध्याचा महत्त्वाचा सिद्धेश्वर तलाव होय. सोलापूर शहराच्या वैभवात व विकासात भर घालणारा हा तलाव इ.स. ११३६ च्या दरम्यान सिद्धरामेश्वरांनी श्रमदानातून खोदल्याची माहिती मिळते. हा तलाव सध्या सिद्धेश्वर मंदिराच्या भोवताली आहे. हा तलाव खोदत असताना त्यावेळच्या नागरिकांनी आर्थिक मदत दिली होती.[४] सिद्धरामेश्वर मंदिराच्या पश्चिमेकडे सोलापूरचा ऐतिहासिक भुईकोट किल्ला असून किल्ल्याच्या बांधकामापूर्वी येथे सिद्धरामेश्वरांनी बांधलेले मल्लिकार्जुनचे मंदिर होते. या मंदिरात अन्नछत्र उघडल्यानंतर तेथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून आपल्या शिष्याच्या मदतीने श्रमदानातून या तलावाची निर्मिती केली आहे.[५] सिद्धेश्वर तलावात पाण्याचा साठा वाढावा यासाठी काही विहिरी व आड खोदण्यात आले होते[६]. ब्रिटिशांच्या आगमनानंतर सोलापूर नगरपालिकेने स्वच्छ पाणी मिळावे यासाठी इ.स. १८५२ व इ.स. १८६६ या काळात तलाव स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला[७]. तलावातील गाळ व कंजाळ काढून तलाव स्वच्छ करण्याचा प्रयत्न पुढील काळात नगरपालिकेने केला होता.[८] हा तलाव दगडी घाटयुक्त असून गणपती घाट, विष्णू घाट, बांगडी घाट, हत्ती घाट, व हनुमान घाट असे अनेक घाट पहावयास मिळतात. गणपती घाट ईशान्येला असून विष्णू घाटावर विष्णूचे मंदिर पहावयास मिळते. जवळच एकनाथांच्या देवळा शेजारी नाथघाट पहावयास मिळतो. पठाण हॉल वरिपन हॉल बागेच्या मध्ये प्रभू घाट असून तलावाच्या दक्षिणेच्या बाजूस शाही घाटावर शहाजोहरवळीचा दर्गा आहे. या घाटाच्या शेजारी संमती कट्टा घाटावर सिद्धरामेश्वरांच्या काठ्यांचे लग्न लावले जाते. सिद्धेश्वरांनी स्थापन केलेले परमेश्वर लिंग हे मल्लिनाथ घाटावर असल्याचे दिसून येते.[९]

## माळशिरस तालुक्यातील पर्यटन स्थळे

सोलापूर जिल्हा हा भीमा-सीना माण नद्यांच्या परिसरात असलेला जिल्हा आहे. सोलापूर जिल्ह्यामधील पंढरपूर, सांगोला, माळशिरस ही गावे अगोदर सातारा विभागात मोडत होती. १८७५ मध्ये माळशिरस सातारा विभागातून सोलापूर जिल्ह्यास जोडण्यात आले आहे.

मंदिरे ही सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिकोनातून महत्त्वाची वाटतात. मानवाला शांतता मिळवून देणारी ही ठिकाणे आहेत. मंदिरे आणि धार्मिक स्थळामुळे पर्यटन व्यवसायास चालना मिळाल्याने त्या त्या ठिकाणचा विकास होत गेला. माळशिरस तालुक्यातील बरीचशी मंदिरे ही चालुक्य काळानंतरची आहेत. ही मंदिरे हेमाडपंथी स्वरूपाची आहेत. त्यामध्ये पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले दहिगाव येथील जैनांचे मंदिर आहे. अकलूज येथील प्रसिद्ध ऐतिहासिक भुईकोट किल्ला पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो. त्याचप्रमाणे अकलाई देवी मंदिर, आनंदी गणेश मंदिर, वेळापूर येथील हरणेश्वर महादेव मंदिर अशी अनेक ठिकाणे पर्यटनाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहेत. पर्यटनाच्या दृष्टीने अकलूजचा किल्ला हा महत्त्वाचा मानला जातो.

हा किल्ला सिंघण यादव यांनी इ.स. १२११ मध्ये बांधला. त्यांच्याच काळात शिंगणापूरचे महादेवाचे मंदिर ही बांधण्यात आले[१०]. ३.२८ एकरमध्ये भुईकोट किल्ला बांधला असून त्याच्या बाजूने मजबूत अशी तटबंदी पहावयास मिळते. हा किल्ला अकलूजच्या मध्यभागी असून किल्ल्याच्या बाजूने नीरा नदी वाहते. किल्ल्याच्या जीर्णोद्धारात अकलूज ग्रामपंचायतचे १९७५च्या दरम्यान असलेले सरपंच श्री जयसिंह मोहिते पाटील यांनी योगदान दिले आहे. येथे ३२ वीरगळ आणि ३ सतीगळ किल्ल्यात सापडतात.[११] औरंगजेबाने अकलूजचे नाव बदलून असदनगर असे ठेवले होते. आता हा किल्ला पाहण्यासाठी हजारो पर्यटक अकलूज येथे भेट देतात.

माळशिरस तालुक्यात विविध प्रसिद्ध मंदिरे पहावयास मिळतात. त्यामध्ये अकलूजचे अकलाई देवी मंदिर आणि वेळापूरचे हरणेश्वर महादेव मंदिर यांचा समावेश होतो. हरणेश्वर महादेव मंदिर हे वेळापूर या ठिकाणी असून[१२] या मंदिराला अर्धनारी नटेश्वर मंदिर असेही म्हटले जाते. वेळापूर प्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील महत्त्वाचे मंदिर म्हणजे अकलूजचे अकलाई देवी मंदिर होय. हे मंदिर नीरा नदीच्या काठावर असून बाबासाहेब माने-पाटील, शंकरराव मोहिते-पाटील, आणि बाबुराव देशमुख यांनी या मंदिराचा जिर्णोद्धार केला आहे. अकलूजचे नाव हेच या अकलाई देवीच्या नावावरून आले आहे. अकलाई देवी ही अकलूजची ग्रामदैवत मानले जाते. मंदिरात बाजूला खर्जाई आणि खोकलाई देवीचे मंदिरे आहेत. आषाढ महिन्यात अकलाई देवीची यात्रा भरते. देवीच्या पालखीपुढे पोतराज आणि गोंधळी नाचताना दिसून येतात.[१३] अकलाई देवीस कवड्याची माळ व पुरणाच्या पोळीचा नैवेद्य आवडतो.[१४]

## पंढरपूर तालुक्यातील पर्यटन स्थळे

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर हे दक्षिण भारतातील एक प्राचीन तीर्थक्षेत्र असून भीमा नदीच्या उजव्या तीरावर वसलेले आहे. पंढरपूरातील पांडुरंगाच्या दर्शनास महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, गुजरात राज्यातून लाखो पर्यटक ( भाविक ) येत असतात. आषाढी, माघी, चैत्री, कार्तिकी, एकादशीला वारकरी दिंड्या व भाविक भेट देत असतात. पंढरपूरात विठ्ठल रुक्मिणीच्या बरोबर अनेक छोटे-छोटे मंदिरे दिसून येतात. पंढरपूरचे विठ्ठल मंदिर हे स्थापत्य शैलीचा एक उत्कृष्ट नमुना आहे. हे मंदिर दगडी असून मंदिराची लांबी ३५०फुट आणि रुंदी १७० फुट असल्याचे दिसून येते[१५]. भक्त पुंडलिकाचे मंदिर चंद्रभागेच्या पात्रात असून पेशव्यांचे सरदार भाटे यांनी या मंदिराचा जिर्णोद्धार केला. गाभाऱ्यात शिवलिंग आहे. शिवलिंगावर पुंडलिकाचा मुखवटा लावून त्याची पूजा केली जाते. पुंडलिकाचे पुजारी हे कोळी समाजाचे आहेत[१६]. विठ्ठल मंदिरापासून १ मैल अंतरावर आग्नेय दिशेस गोपाळकृष्ण मंदिर आहे. येथे आषाढी, कार्तिकी यात्रेस गोपाळकाला होतो. येथे संत जनाबाईचा संसार पहावयास मिळतो. तेथे एक दगडी रांजण असल्याचे दिसून येते.[१७]

पंढरपूर शहरात विठ्ठल मंदिराप्रमाणेच विष्णू मंदिर, अंबाबाई मंदिर, मल्लिकार्जुन मंदिर, द्वारकाधीश मंदिर, काळभैरवाचे मंदिर अशी अनेक मंदिरे असून त्यामुळे पंढरपूरच्या सांस्कृतिक इतिहासात भर पडली आहे. विठ्ठल मंदिराच्या समोर काळभैरवाचे मंदिर आहे. मंदिराचे प्रवेशद्वार दगडी आहे. इ.स. १७७० मध्ये कोकणे सावकारानी काळभैरवनाथ मंदिराची स्थापना केली[१८]. वारीच्या काळात पंढरपूरात भक्तांची, पर्यटकांची प्रचंड गर्दी असते. गर्दीच्या काळात भाविक मंदिरात न जाता मंदिराच्या कळसाचे व नामदेव पायरीचे दर्शन घेतात. पर्यटनाच्या दृष्टिकोनातून सोलापूर जिल्हा महत्त्वाचा असला तरी जिल्ह्यातील सर्वच महत्त्वाच्या धार्मिक स्थळावर प्रकाश टाकणे अवघड असल्याने सोलापूर शहर, पंढरपूर व माळशिरस मधील काही ठराविक पर्यटन स्थळावरच प्रकाश टाकण्यात आला आहे. पर्यटनाच्या दृष्टीने अलीकडील काळात सोलापूर जिल्ह्यास महत्त्व प्राप्त होण्याची कारणे पाहिली असता त्यातून शहर व जिल्ह्याच्या सांस्कृतिक इतिहासात भर तर पडतेच तसेच पर्यटन स्थळे म्हणून अनेक ठिकाणे प्रसिद्धीस येऊ लागली आहेत. अशा पर्यटनस्थळी बाराही महिने पर्यटक आपली हजेरी लावत असतात.

## पर्यटनाचे फायदे

पर्यटन हा महाराष्ट्राच्या विकासाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. स्थानिकांना बसल्याजागी उत्पन्नाचे एक नवीन साधन निर्माण होते. व आपली संस्कृतीही टिकवायला मदत होते. आजच्या आधुनिक काळामध्ये व्यक्ती, समाज, राष्ट्र पर्यटनापासून अलिप्त राहू शकत नाही. पर्यटनामुळे स्थानिक उत्पादनांना आयती बाजारपेठ उपलब्ध होते. व आर्थिक उलाढाल वाढण्यास मदत होते. यामुळे पर्यटनस्थळांचे, ऐतिहासिक वास्तूंचे,पर्यावरणाचे जतन व विकास होतो. अशा प्रकारे पर्यटनामुळे आर्थिक, सामाजिक, व सांस्कृतिक विकास घडून येतो.

## संदर्भग्रंथसूची व तळटीपा

१) Solapur District Gazeteer 1977. P. 12
२) जयदेवीताई लिगाडे, श्री सिद्धरामाची ...........१९५८ पृ. ४
३) महाराष्ट्र राज्य गॅझेटीयर प्राचीन काळ, खंड- १, पृ. ६९३-६९४
४) Solapur District Gazeteer 1977. P. 987
५) सरदेसाई गो. स., मुसलमानी रियासत, खंड- १, १९९३, पृ. २३३
६) जक्कल वि.न., सोलापूर शहर इतिहास, १९२८, पृ. ८३
७) General Department file, vol.xiii, 1851, P.277 ( B.A. )
८) Gazeteer of Bombay President, 1854, P. 495
९) सोलापूर समाचार, १३ जानेवारी १९५६
१०) Kinkade and Parasnis A History of the Maratha people, 1968, P. 35
११) त्रैमासिक, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, खंड-६६, १९७८, पृ. ७८
१२) Nulkar S.P., Archaeology in Solapur District Unpublished thesis B.A.M.U. Aurangabad, P. 230-32.
१३) Records of Akluj Grampanchayat
१४) सकाळ वृत्तपत्र, सोलापूर, २७ जुलै २००७
१५) डॉ. गोपाळ बेणारे, राणा पंढरीचा, श्री संत सेवा प्रकाशन, पंढरपूर, आवृती पहिली, १९९३, पृ. ६३
१६) प्र.क्र. भाटे, बरवे बरवे पंढरपूर, प्रथमावृती, २०००, पृ. ६५
१७) भारतीय संस्कृती कोश, चौथी आवृती, २००१, खंड-५, पृ. ३३९
१८) डॉ. गोपाळ बेणारे, उपरोक्त पृ. २९